# प्रकरण पाचवे
# उपसंहार

# प्रकरण पाचवे
# उपसंहार

कवी ना. घ. देशपांडे हे विदर्भातील महत्त्वाचे कवी आहेत. त्यांचे 'शीळ', 'अभिसार', 'खूणगाठी', 'कंचनीचा महाल', 'गुंफण' अशी एकूण पाच काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. प्रस्तुत लघुप्रबंधात त्यांच्या 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या दोन काव्यसंग्रहाचा विविधांगाने अभ्यास केला आहे. यातच त्यांच्या काव्याची गुणवैशिष्ट्ये अभ्यासली आहेत. प्रस्तुत पाचव्या प्रकरणामध्ये यापूर्वीच्या प्रकरणाच्या आधारे उपसंहार करण्याचे प्रयोजन आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधाची सुरुवात प्रास्ताविकाने केली आहे. प्रास्ताविकामध्ये प्रामुख्याने आधुनिक कवितेच्या वाटचालीचा (इ.स. १८८५ ते १९४०) आढावा घेतला आहे. आधुनिक कवितेचे जनक कवी केशवसूतांनी मराठी कवितेत आमूलाग्र बदल घडवून मराठी काव्याला खऱ्या अर्थाने वेगळे वळण दिले. त्यानंतर त्यांचा केशवसूती संप्रदाय गोविंदाग्रज व इतर कविमंडळींनी पुढे प्रवाहित ठेवला. बालकवी, विनायक, रेव्हरंड टिळक, रेंदाळकर यांनी मराठी काव्याच्या समृध्दीला मोलाचा हातभार लावला. तर इ.स. १९३० ला रविकिरण मंडळ स्थापन होऊन त्याच्यातील सदस्यांनी कवितेतून जनसामान्याच्या हृदयाला स्पर्श केला. या काळातील कविता गणेशोत्सव व इतर सामाजिक कार्यक्रमात गायिली जात असे त्यामुळे या काळात कवितेला लोकप्रियता मिळू लागली होती. तेव्हाच इतर समकालिन कवींनी देखील योग्यरित्या आपले काव्यलेखन करीत मराठी काव्यात भर घालण्याचे काम केलेले पहावयास मिळते. त्यात वा. ना. देशपांडे, गु. ह. देशपांडे, बा. भ. बोरकर हे कवी अग्रेसर होते. याच काळात विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात कवी ना. घ. देशपांडे यांची कविता अंकुरत होती. त्यांच्या 'शीळ' या पहिल्याच कवितेचे ध्वनिमुद्रीत होऊन ते अवघ्या महाराष्ट्राला कवी म्हणून परिचित झाले. येथे केशवसूत ते कवी ना. घ. देशपांडे असा कवितेच्या आढावा प्रास्ताविकामध्ये घेतला आहे.

त्यानंतर पहिल्या प्रकरणामध्ये कवीच्या व्यक्तिगत जीवनाचा अभ्यास केला आहे. कवीच्या काव्यावर त्याच्या व्यक्तिगत जीवनाचा प्रभाव असतो. म्हणून कवितेच्या अभ्यासात कवीचे व्यक्तिमत्व जाणून घेणे अपरिहार्य असते. कवीच्या व्यक्तिगत जीवनाचा प्रभाव त्याच्या कवितेवरती पडून कविता सजिव बनते. भावकविता ही आत्मनिष्ठ असते. कविमनातील भावना, कल्पना कवितेचे रूप धारण करीत असते. त्याच्या या भावनांवर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव जाणवतो. म्हणून कवी ना. घ. देशपांडे यांच्या काव्यसंग्रहातील कविता समजून घेण्यापूर्वी कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा आढावा घेणे महत्त्वाचे वाटते. या प्रकरणात कवी ना. घ. देशपांडे यांचा जन्म, बालपण, त्यांचे प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण याबाबतच्या माहितीचा आढावा घेतला आहे. शिक्षण घेत असताना जीवनात आलेल्या अनेक अडचणी सांगितल्या आहेत. याचबरोबर त्यांना काव्यलेखनाची प्रेरणा कशी व कोठून मिळाली त्याबाबतचे विवेचन केले आहे.

कवीला लहानपणापासून कवितेची ओढ होती. त्यांचे वडील धार्मिक असल्याने ते आध्यात्मिक कविता करीत असत. त्यांच्या प्रेरणेतून कवी काव्य करण्यास प्रवृत्त झाले. चौथीला असताना वर्गातील प्रौढ विद्यार्थ्यांनी गायीलेली कविता, फडाच्या लावणीतील ऐकलेला कार्यक्रम याचा त्यांच्या कविमनावर प्रभाव पडल्याचे दिसते, याचा विचार प्रस्तुत प्रकरणात केला आहे. महाविद्यालयीन जीवनात ग्रे, बायरन, एलियट व इतर मराठीतील प्रमुख कवी यांच्या काव्याचा त्यांनी जाणीवपूर्वक अभ्यास केला. त्यामधून त्यांची काव्याबाबतची ओढ लक्षात येते. त्याचबरोबर शिक्षणासाठी केलेली धडपड, वकिली व्यवसाय व त्यामधून जीवनात निर्माण झालेला संघर्ष याबाबत विवेचन केले आहे. विवाहानंतरच्या काळात त्यांच्या काव्याची पहिली वाचक म्हणून त्यांच्या पत्नी सौ. शांताबाई देशपांडे या असलेल्या दिसतात. कवीच्या कवितांचे गायन त्या स्वत: करीत असल्याने तिच्यापासून कवी ना. घ. देशपांडे यांना कविता लिहिण्याचा अधिक हुरूप आल्याचे दिसते. प्रत्येक पुरूषाच्या यशामध्ये स्त्रीचा वाटा असतो हे येथे प्रत्ययास येते. या कालावधीतच लहानपणापासून असलेल्या पोटाच्या व्याधीने अधिकच त्यांना त्रस्त

करून सोडल्याचे दिसते. त्यामुळे या काळात त्यांची कविता थोडी ईश्वराकडे झुकलेली दिसते. आयुष्यात साहित्यातील कथा, कादंबरी, काव्य किंवा अन्य यापैकी एकच वाङ्मय प्रकार व्यक्तीने हाताळावा असे त्यांचे मत आहे. त्यामुळे त्या वाङ्मय प्रकाराला योग्य न्याय देता येतो असे त्यांना वाटते. ललित लेखनामुळे त्यांना अनेक मानसन्मान मिळाले आहेत. काव्यातील उत्कृष्टतेमुळे 'खूणगाठी' या काव्यसंग्रहाला 'साहित्य अकादमी पुरस्कार' प्राप्त झाला. 'अभिसार' या काव्यसंग्रहाला १९६३ चा 'महाराष्ट्र राज्य पुरस्कार' लाभला. इ.स. १९६० मध्ये दिल्ली येथे अ. भा. कविसंमेलनात मराठी कवितेचे त्यांनी प्रतिनिधित्व केल्याचे दिसते. १९८४ ला ३५ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले. त्याचबरोबर इंग्रजी, जर्मन, फ्रेंच भाषेत त्यांचे काव्य अनुवादित झालेले दिसते. जीवनाच्या उत्तरार्धात 'फुले आणि काटे' हे लेखपर आत्मकथन लिहून आपल्या कवितांवर त्यांनी प्रकाश टाकल्याचे दिसते. त्यांचे व्यक्तिगत जीवन व काव्यात येणाऱ्या भावभावना, कल्पना एकमेकांस पूरक असलेल्या दिसून येतात. या सर्व बाबींचा विचार या प्रकरणात केला असून पहिल्या प्रकरणाचे लिखाण याठिकाणी पूर्ण केले आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात 'शीळ' या काव्यसंग्रहातील आशय, स्वरूप व रचनावैशिष्ट्यांचा सविस्तर अभ्यास केला आहे. इ.स. १९२६ मध्ये त्यांनी खऱ्या अर्थाने काव्यलेखनाला सुरवात केली. १९५४ मध्ये त्यांनी आपल्या अनेक विस्कळीत कविता एकत्र करून 'शीळ' या नावाने ८२ कवितांचा काव्यसंग्रह प्रसिध्द केला. 'शीळ' या काव्यसंग्रहाचा अभ्यास करताना या प्रकरणात कवितांचे प्रेमकविता, निसर्गकविता, जीवनविषयक कविता, सामाजिक कविता, कौटुंबिक कविता, गझल, आध्यात्मिक कविता, गुढगुंजनपर कविता अशाप्रकारे वर्गीकरण करून सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. ना. घ. देशपांडे यांची प्रेमकविता मनात विशुध्द प्रेमभावना रूजविणारी आहे. प्रियकर-प्रेयसी शारीरिक आकर्षणातून एकत्र आलेले नसून त्यांच्यातील असलेल्या निखळ प्रेमामुळे जवळ आली आहेत. समाजाचा विरोध असला तरी प्रतिरोध करणारे प्रेमयुगुल येथे चित्रित झाले आहे. निसर्गकवितेतून

प्रेमातील नाजूकता, हळूवारपणा जपला आहे. त्याचबरोबर निसर्गातील विविध घटकांचा, रूपाचा येथे अभ्यास केला आहे. निसर्गाचे मानवी आरोपण 'निजली राने', 'हासली फुले' अशाप्रकारच्या प्रतिमांतून दाखविले आहे. ना. घ. देशपांडे यांच्या कवितेत समाजाच्या वाईट कृत्यांबद्दल विरोध आहे. मात्र मानवतेविषयी, दुर्बल घटकांविषयी प्रेम, करूणा, दया इत्यादी भाव आलेले दिसतात. ग्रामीण भागातील शेती व्यवसायातून जानपदगीते निर्माण झालेले दिसतात. तर पत्नीच्या, आईच्या प्रेमातून कौटुंबिक कविता साकार झाल्याचे दिसते. प्रियकर-प्रेयसी यांच्यातील आकर्षण, आतुरता, प्रतीक्षा, रूसवे-फुगवे, पत्नीविषयी असलेली ओढ, तिच्या सौंदर्याचे वर्णन व आईविषयक असलेले वात्सल्य याचा विचार प्रस्तुत प्रकरणात विस्तृतपणे केला आहे. कवीच्या स्त्रीविषयक असलेला समानतेचा, स्वतंत्रतेचा दृष्टीकोन सांगितला आहे. याचप्रमाणे इतर ही काही मुद्दयाचा ओघाने विचार केला आहे. प्रकरणाच्या उत्तरार्धात 'शीळ' काव्यसंग्रहाची रचना, शीर्षकाची यथार्थता सांगून त्यांनी काव्यात वापरलेल्या प्रतिमा-रूपके, यमक, अलंकार याचा शोध घेतला आहे व येथे प्रकरणाचा शेवट केला आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये इ.स. १९९६ साली प्रकाशित झालेल्या 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहात असलेल्या एकूण चार दीर्घकवितांचा अनुक्रमे विस्तृतपणे अभ्यास केला आहे. या काव्यसंग्रहातील कवितांचा अभ्यास करताना प्रत्येक कविता स्वतंत्रपणे घेऊन त्यातील कथाबिज, प्रेमकविता, निसर्गवर्णन, कवितेतील अद्‌भूतता (वेगळेपणा), पात्रवर्णन, स्त्रीचे रूप व शृंगार वर्णन पाहिले आहे. 'कंचनीचा महाल' या कवितेत कंचनीचे सौंदर्य, गुण, ओसाड भग्न महाल व त्यातून निर्माण होणाऱ्या अद्‌भूत्तेचे वर्णन आले आहे. त्याचा अभ्यास येथे केला आहे. 'गिरिजेचा संसार' या कवितेत गिरिजेच्या उद्‌ध्वस्त संसाराचे, तिच्या विवाहाचे आणि नातेसंबंधाचे चित्रण आले आहे. 'नि:श्वास गीतावली' या कवितेत आई-मुलाचे प्रेम, त्यांच्यातील ओढ दर्शविली आहे. मुलाची कारूण्यता, आकांत त्यांच्या मनात असलेली खंत दाखवून ही कविता विलापिका असल्याचे स्पष्ट केले आहे. 'जुईची कळी' या कवितेत प्रेमाच्या विविध छटा, त्यातील भाव, रूपे अधिक सखोलपणे पाहिली आहेत. निसर्गातील सौंदर्य,

विविधता, पिके यांचा उल्लेख केला आहे. ऐकीव दंतकथाचे दीर्घकाव्यात झालेले रूपांतर, कथाकाव्य याबाबत विवेचन केले आहे.

या प्रकरणाच्या उत्तरार्धात कवितेची रचनावैशिष्टये स्पष्ट करताना कवितेची रचना, शीर्षकाची अन्वर्थकता स्पष्ट केली आहे. काव्य दीर्घरूपात असले तरी ओघवते व गतिमान असल्याचे दिसते. काव्यात आलेली कथात्मकता रसिक वाचकास रंजक त्याचबरोबर प्रसंगानुसार कारूण्यमय वाटल्यावाचून राहत नाही. रचनावैशिष्ट्यांचा विचार करताना कवितेत येणारे अलंकार, प्रतिमा, गेयता, कथात्मकता, प्रायोगिक रचना, रसाभिव्यक्ती यांचा उदाहरणासहित विचार केला आहे. 'गिरिजेचा संसार' या कवितेत प्रश्नालंकार व स्वभावोक्ती अलंकार यांचे आधिक्य दिसते. तर 'निःश्वास गीतावली' मध्ये विविध प्रतिमा प्रकर्षाने जाणवतात. 'जुईची कळी' या कवितेतील उच्चारण व लेखन याबाबत कवीची प्रयोगशिलता लक्ष वेधून घेणारी आहे. अशाप्रकारे 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहातील कवितांचा आशय, स्वरूप व रचनावैशिष्ट्यांचा विविध अंगाने अभ्यास करून शेवटी समारोप देऊन हे प्रकरण येथे संपविले आहे.

प्रकरण चौथ्या मध्ये 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहाच्या आधारे कवीच्या कवितालेखनाची वैशिष्ट्ये नोंदविली आहेत. या प्रकरणात कवितेतील भावकवितेच्या आधारे प्रेमकविता, कवितेतील निसर्ग या वैशिष्ट्यांचा विचार सविस्तरपणे केला आहे. त्याचबरोबर प्रायोगिक रचना, गेयता, प्रसंगवर्णनातील चित्रमयता, शैली या विशेषांचा अनुक्रमे उदाहरणसहीत विस्तृत अभ्यास केला आहे. या मुद्दयांच्या आधारे कवीच्या काव्य लेखनातील विशेषत्त्वाचा परामर्श घेतला आहे. भावकविता या विशेषामध्ये प्रेमकविता व निसर्गकविता यांचा समावेश होत असला तरी काव्यविशेषाचा अधिक सखोल अभ्यास करण्याच्या हेतूने हे दोन्ही विशेष 'भावकविता' या विशेषापासून स्वतंत्रपणे वर्णन केले आहे. प्रेमातील निर्मळता, निर्व्याजपणा, आतुरता, प्रतीक्षा, सफल प्रेम, विफल प्रेम यांचा विचार येथे केला आहे. निसर्ग व प्रेम यांचा सुरेख संगम प्रस्तुत कवितेमध्ये कवीने साधलेला दिसून येतो. कवी ना. घ. देशपांडे यांनी आपल्या

काव्यात यमकाचा वापर केला असल्यामुळे कवितेत ताल, नाद, लय निर्माण झाला असल्याचे दिसते. तसेच अलंकार, प्रतिमाचा अचूक वापर केल्याने काव्य प्रभावी ठरल्याचे दिसते. काव्यात गेयता गुण आल्याने त्यांचे काव्य गीत बनते. या काव्यावर लोकगीतांचा, लावणी वाङ्मयाचा प्रभाव असल्याचे लक्षात येते. त्यांच्या अनेक कवितेतून प्रादेशिकतेची वैशिष्ट्ये दिसून येतात. कवीच्या काव्यात बोलीभाषेचे वेगळेपण आणि प्रादेशिकता प्रकर्षाने जाणवते. कवी ना. घ. देशपांडे यांच्या अनेक कविता चित्रमय, नाट्यात्मक वाटतात. चित्रमय प्रसंगवर्णन हे त्यांच्या कविताचे विशेष सांगता येते.

'शीळ' काव्यसंग्रहातील कवितेचे लघुत्व व 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहातील कवितेचे दीर्घरूप कवीचे वेगळेपण सिध्द करते. कवीने कवितेत आणलेली प्रायोगिकता, नवता महत्त्वपूर्ण असल्याचे दिसते. मात्र पुढच्या काळातील कवींनी ही प्रायोगिक रचना, नवीनता स्वीकारली नाही. याबाबत खंत वाटते. शेवटी कवीची भाषाशैली, शब्दकळा, लेखनशैली याबाबत विचार मांडला आहे. ग्रामीण भागात वास्तव्य केल्याने कवितेत आलेली ग्रामीण बोली, शिक्षणातून अंगीकृत केलेली प्रमाणभाषा व कौटुंबिक संस्कारातून व वाचनातून आत्मसात केलेली संस्कृत भाषा यांची त्यांच्या काव्यात झालेली सरमिसळ उदाहरणाद्वारे स्पष्ट करून सांगितली आहे. विदर्भातील वऱ्हाडी बोलीची लकब काव्याच्या सौंदर्यात भर घालताना दिसते. त्याचबरोबर येथे ग्रामीण तसेच शहरी शब्दाचा वेगळेपणाने विचार करून संस्कृत भाषेतील काही शब्दांचा परामर्श घेऊन वेगळेपणा सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रादेशिक शब्द त्यांच्या काव्यात उठून दिसतात. त्यांचा सुध्दा अभ्यास विस्तृतपणे केला आहे. प्रकरणाच्या शेवटी समारोप केला आहे.

अशाप्रकारे आतापर्यंत एकूण चार प्रकरणातून आपण कवी ना. घ. देशपांडे यांच्या 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या दोन काव्यसंग्रहातील सांगोपांग अभ्यास केला आहे. शेवटच्या पाचव्या प्रकरणात एकूण अभ्यासातून हाती आलेले निष्कर्ष सूत्ररूपाने लक्षात घेतले आहेत. आयुष्यभर फक्त 'कविता' हा वाङ्मय प्रकार हाताळून मराठी 'काव्य' या साहित्यप्रकारात कवी ना. घ. देशपांडे यांचे योगदान भरीव असल्याचे दिसून येते.

कवी ना. घ. देशपांडे यांच्या 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहाचा अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष हाती आले ते पुढीलप्रमाणे सांगता येतील -

**निष्कर्ष :**

१. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना काही प्रसिध्द मराठी कवी बालकवी, माधव ज्युलिअन त्याचबरोबर एलियट, बायरन, ग्रे या इंग्रजी कवीच्या कवितेचा प्रभाव त्याच्या काव्यावर झालेला दिसतो.

२. कवी ना. घ. देशपांडे यांनी आयुष्यभर केवळ ('फुले आणि काटे' हे आत्मकथनपर लेखाचे पुस्तक वगळता) कविता हाच साहित्य प्रकार हाताळल्याचे दिसते.

३. ना. घ. देशपांडे ज्या निसर्गरम्य परिसरात वास्तव्यास होते. तो परिसर मनुष्याच्या मनाला मोहित करणारा असल्याने त्यांच्या कवितेत निसर्ग चैतन्यरूप घेऊन येतो.

४. स्त्रीवरील निखळ प्रेम व्यक्त करणारे कवी म्हणजे ना. घ. देशपांडे होत.

५. कवीच्या काव्यात आलेले प्रेम हे जोरजबरदस्ती, हक्क गाजविणारे नसून उन्माद पण हळूवार, नाजूकपण जपणारे असे आहे. त्यांच्या प्रेमात धिटाई आहे व त्याचबरोबर थोडी अनामिक भिती सुध्दा आहे. त्यांची कविता स्त्री देहाचे वर्णन करीत असली तरी भडक शृंगार त्यात नाही.

६. कवी ना. घ. देशपांडे यांची कविता समाजात रममाण न होता निसर्गाकडे धाव घेणारी आहे. निसर्गाला विश्रांती स्थान मानणारी आहे असे असलेतरी त्यांच्या मनात समाजाविषयी, त्यातील मानव्याविषयी, दुर्बल घटकांविषयी आत्यंतिक तळमळ असल्याचे दिसते.

७. कवीच्या काव्यात आध्यात्मिक जीवन प्रभावीपणे येत नसले तरी, त्यांचा परमेश्वरावर दृढ विश्वास असल्याचे लक्षात येते. त्यांच्या काव्यावरून निर्माणकर्त्याविषयी त्यांच्या मनात आस्था असल्याचे दिसून येते.

८. 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या दोन्ही काव्यसंग्रहातील कवितेत निसर्गाचे ओघवते चित्रण आलेले आहे.

९. प्रेम व निसर्ग यांची एकरूपता हे त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्ये होय.

१०. कवी ना. घ. देशपांडे यांनी तत्कालिन स्थितीत शब्द आणि अर्थ यांचा सुंदर मिलाफ घडवून भावकविता लिहिल्याचे दिसते. त्यांनी लिहिलेल्या कवितेत बहुतांशी उत्कट भाव प्रदर्शित होतो. म्हणून त्यांना भावकवी असे म्हणणे योग्य ठरते.

११. 'शीळ' आणि 'कंचनीचा महाल' या दोन्ही काव्यसंग्रहात प्रियकर-प्रेयसी, पती-पत्नी, आई-मुलगा, आई-मुलगी यांच्यातील प्रेमभाव व्यक्त होतांना दिसतो. त्यांच्या काव्याचा मूळ विषय 'प्रेम' हाच असल्याचे आपणास दिसते म्हणून त्यांना 'प्रेमकवी' संबोधण्यास काहीही वावगे नाही.

१२. कवीने आपल्या परिसरातील ऐकीव दंतकथाचे सुंदररित्या दीर्घकाव्यात रूपांतर केल्याचे दिसते. त्यांचे काव्य (कंचनी महाल काव्यसंग्रहातील) दीर्घ स्वरूपाचे असले तरी प्रारंभ ते शेवट रसिकवाचकास गुंतवून ठेवणारे असे आहे.

१३. ना. घ. देशपांडे यांच्या कवितेत गतिमानता हा गुण प्रकर्षाने जाणवतो.

१४. 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या दोन्ही काव्यसंग्रहात आलेली शब्दकळा नाजूक अशी आहे. त्यांची कविता अनेकार्थी बनत नाही. त्यामुळे कविता दुर्बोध बनण्यापासून अलिप्त राहते.

१५. कवी ना. घ. देशपांडे यांच्या प्रत्येक कवितेत यमक, लयबध्दता, नादानुवर्तीप्रास, ध्वनी निर्माण होत असल्यामुळे त्यांच्या काव्यास गेयता निर्माण होऊन ते चालीवर म्हणता येते. त्यामुळेच त्यांच्या अनेक कविता ध्वनिमुद्रीत झालेल्या दिसतात. काव्यात गेयता अधिक येत असल्याने त्यांना गेयकवी म्हणणे उचित ठरते.

१६. अत्यंत सूक्ष्म, तरल, उत्कट आणि भावपूर्ण अशी अनुभूती वाचकांच्या मनात संक्रमित करण्याचे अभिव्यक्तीचे सामर्थ्य ना. घ. देशपांडे यांच्या कवितेत आहे.

१७. कवी ना. घ. देशपांडे यांच्या कवितेने मराठी कवितेच्या सौंदर्यवादी व गेयपरंपरेला समृद्ध केले आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेचे हे योगदान मराठी कवितेच्या इतिहासात उल्लेखनिय ठरणारे आहे.